Vol 3 Issue 4 Jan 2014

Impact Factor : 1.6772 (UIF)

ISSN No : 2249-894X

Monthly Multidisciplinary Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Catalina Neculai
University of Coventry, UK

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Review Of Research
Vol. 3, Issue. 4, Jan. 2014
ISSN:-2249-894X
Available online at www.ror.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# खानदेशातील धर्म संकल्पना, रूढी आणि परंपरा : एक समाजशास्त्रीय अभ्यास

रावसाहेब भिमराव नेरकर

इतिहास विभाग प्रमुख, राणी लक्ष्मीबाई महाविद्यालय, पारोळा, जि. जळगांव.

**सारांश :**

खानदेशातील जनतेची धर्मभावनेवर कमालीची श्रध्दा दिसून येते. मानव आणि पशु यात काही मुलभूत फरक आहेत. त्यातील महत्वपूर्ण फरक म्हणजे मानवाकडे असलेली धर्मभावना जी पशूमध्ये नाही. माणूस जीवन जगत असतांना सारखा विचार करीत असतो की आपण जे कर्म करीत आहोत ते योग्य आहे की काही चुकते आहे हा विचार मानवाच्या अंतर्मनापासून येत असतो. मानवाची जशी भोग ऐश्वर्याची वृत्ती आहे तशीच त्याची धर्मभावनाही बलवाल आहे. भारतीय संस्कृतीत अगदी प्राचीन काळापासून 'धर्म' ही संकल्पना चालत आलेली आहे. खानदेशच्या सर्वांगीण जीवनावरही धर्माचे प्राबल्य असलेले दिसते. 'धर्म हा एक व्यापक शब्द आहे. आपले जीवन ज्या नीतीविचारांवर आधारलेले असते. त्याला आपण धर्म म्हणतो'.[1] मानवी जीवनातील आपल्या नियमित आचार–विचारावरही धर्माचा प्रभाव जाणवतो. मानवाने कर्म करताना सत्याचे भान ठेवले पाहिजे. जो जाणून नीतीच्या मार्गाने कर्म करतो तो धर्माचरण करीत असतो. 'धर्मवृत्ती हा भारतीय मनाचा विशेश आहे––– ही धार्मिक मनोवृत्ती वेदोपनिशदांच्या काळापासून कमी–अधिक प्रमाणात आजपर्यंत हिंदुस्थानात सर्वत्र नांदत आहे. नानक, कबीर, चैतन्य, तुलसीदास रामदास इ. सर्व प्रांतातील संत मंडळींनीही हया धर्मवृत्तीचा परिपोश करण्यात आपले बळ खर्च केले आहे'.[2] भारतीय जनमानसावर धर्माचा पगडा होता. या देशाला संत–महंतांची एक शृंखलाच मिळालेली आहे.

## प्रस्तावना :

ज्यांनी धर्माचं खरं रूप समाजासमोर मांडण्याचा प्रयत्न केला. यात स्वामी विवेकानंद, स्वामी दयानंद सरस्वती, स्वामी केवलानंद सरस्वती आणि खानदेशातील आपल्या धर्मशास्त्रावरील अगाध ज्ञानाच्या आधारे धर्मशास्त्रांचे सत्यस्वरूप मांडणारे महामहोपाध्याय पं. श्रीधरशास्त्री पाठक होत. 'तत्वज्ञान, नीती, आचार ही धर्माची तीन अंगे होत.'[3] जगताच्या स्वरूपाविषयीचे तत्वज्ञान, जीवन जगत असतांना नैतीक मार्गाचा अवलंब करणे तसेच व्यक्तीचे आचार यावरून समाजाचे धार्मिक जीवन प्रतिबिंबीत होत असते. 'धर्म ही एक महाशक्ती आहे. समाजाचा उत्कर्षापकर्ष बव्हंशी धर्मावर अवलंबून असतो.'[4] समाजजीवनाच्या उत्कर्शासाठी त्या समाजावर असलेली धार्मिकतेची पकड महत्त्वपूर्ण असते. 19 व्या शतकात समाजमनांवर धार्मिकतेची जबरदस्त पकड होती. परंतू सनातनी मंडळींनी याचा वेगळाच फायदा उचललेला दिसतो. धर्मवेडया खानदेशी माणसांच्या मनांवर धर्मसंकल्पनेचे विकृत स्वरूप बिंबवले होते. यातून समाजाची सुटका करण्याचा आणि समाजाला विधायक दिशा देण्याचा वारकरी संप्रदायाने प्रयत्न केल्याचे निदर्शनास येते. खानदेशात वारकरी संप्रदायाच्या बऱ्याच संस्था कार्यरत असून त्यात उत्राण, खर्ची व आडगांव या एरंडोल तालुक्यातील गावांमधील वारकरी मंडळे, पाचोरा तालुक्यातील माहीजी, चाळीसगावातील वालझिरी तसेच जळगांव व पाचोरा येथील संस्थांचा महत्त्वपूर्ण सहभाग धार्मिक प्रबोधनामध्ये असलेला दिसतो'.[5]

## खानदेशातील धर्मपंथ

खानदेशच्या धर्मजीवनात विविध धर्मपंथींयांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. खानेदशात महानुभव पंथ, वारकरी

संप्रदाय, सूफी पंथ, जैन संप्रदाय, बौध्द संप्रदाय अस्तित्वात असलेले दिसून येतात. 'वारकरी संप्रदाय हा एकच असा संप्रदाय आहे की, त्यामध्ये ब्राह्मणापासून अतिशूद्रापर्यंत सर्व जातीजमातीचे संत जन्माला आले.'[6] खानदेशच्या धार्मिक जीवनात वारकरी संप्रदायाचा प्रभाव असल्यामुळेच त्यांच्या उदारमतवादी धोरणाचा अवलंब करून सुधारणावादी चळवळीस प्रारंभ झाल्याचे दिसते. यातूनच सुधारणावादी विचारसरणीचा अवलंब करणारे धनाजी नाना चौधरी, काकासाहेब बर्वे, आणि श्रीधरशास्त्री पाठकांसारखे कार्यकर्ते पुढे आलेले दिसतात. खानदेशाज प्राचीन काळापासून हिंदू, मुस्लीम, बौध्द आणि जैन धर्माचा प्रभाव दिसून येतो. 'बहादरपुर आणि बऱ्हाणपूर ही जैन संप्रदायाची पवित्र स्थळे आहेत.'[7] यातूनच खानदेशच्या धर्मजीवनात जैन संप्रदायाचा प्रभाव असल्याचे प्रत्ययास येतेत्र 'महानुभव पंथाचे संस्थापक चक्रधरस्वामी यांनी खानेदशातील सायगव्हाण, वाघळी, कनाशी, भडगांव, पाचोरा, शेंदुर्णी आदी ठिकाणांना भेटी दिलेल्या आहेत.'[8] खानदेशात महानुभाव संप्रदायाने अनेक लोकांना दीक्षा देऊन आपल्या संप्रदायाची वृध्दि केलेली दिसते. त्याचप्रमाणे खानदेशच्या धर्मजीवनात सूफी संप्रदायाचाही प्रभाव दिसून येतो. 'शिरपूर तालुक्यातील बाबा कबरच्या टेकडीवर कोरलेल्या जैन मूर्ती, बडवानीची मूर्ती, तेथील शिलालेख जैनांची समृध्द परंपरा नांदत होती याची साक्ष देतात. पितळखोऱ्यांची बौध्द लेणी बौध्दाच्या अस्तित्वाची सांस्कृतिक खूण म्हणून नांदतांना दिसते.'[9] खानदेशात विविध संप्रदायाचे साजरे होणारे सण, उत्सव तसेच संतांची परंपरा यावरून खानदेशला समृध्द अशी सांस्कृतिक परंपरा लाभल्याचे दिसते. विविध धर्माच्या संतमहंतांनी आपल्या तत्वज्ञानाने खानदेशातील जनतेला प्रभावित करून आपल्या संप्रदायाची वृध्दि केल्याचेही निदर्शनास येते. 'खानदेशात मुस्लीम धर्मिय राज्यकर्त्यांची प्रदीर्घ काळ सत्ता होती. त्यामुळे सुफी संप्रदायाचा विशेषत्वाने प्रभाव जाणवतो.'[10] खानदेशातील हिंदू धर्मीय आजही पिराला नवस करताना दिसतात. मनातील इच्छा पूर्ण झाल्यास दर्ग्यावर चादर चढविण्याचे प्रकार आजही खानदेशात दिसून येतात. यावरून खानदेशी माणसाच्या धार्मिकतेची कल्पना येते. अशा धार्मिकतेची चाड असलेल्या खानदेशातील जनतेला धर्मतत्वज्ञानाचे योग्य दिग्दर्शन करण्याचे काम श्रीधरशास्त्रींनी केल्याचे दिसते.

### *धार्मिक रूढी आणि परंपरा*

खानदेशी समाजव्यवस्थेवर रूढी–परंपरांचा जबरदस्त पगडा होता. या पारंपारिक प्रथांनाच त्यांनी धर्म मानलेले होते. आणि या रूढी–परंपरांचे मनोभावे पालन ते करीत होते. धर्माच्या नावाखाली अनेक अनिष्ट प्रथा समाजात सर्रास सुरू होत्या.

### *मूर्तीपूजा –*

हिंदू धर्मामध्ये मूर्तीपूता ही एक स्वतंत्र कल्पना मानली जाते. आपल्या मनातील भावना मूर्तीपूजेच्या माध्यमातून हिंदू माणसाने मंदिरात मांडल्या. 'हिंदु धर्माची भक्तीभावना आत मावेनाशी होऊन बाहेर पडू लागली. तीच ही मूर्तीपूजा होय.' [11] मानवाच्या अंतर्मनात जे आहे ते मूर्तीपूजेच्या रूपाने बाहेत पडू लागले. हिंदू धर्मात मूर्तीपूजेला धार्मिक अधिष्ठान आहे. खानदेशातील माणूस मोठया भक्तीभावाने, श्रध्देने, सात्विक अंतःकरणाने मूर्तीपूजा करताना दिसतो. त्याची परमेश्वरावर नितांत श्रध्दा असून तो भाविक आणि श्रध्दाळू आहे. अशा या परमेश्वरावर श्रध्दा असणाऱ्या समाजव्यवस्थेत मात्र हिंदूच्या मंदिरात जाऊन दर्शन घेण्यास वरीश्ठ जातीतील हिंदूधर्मियांची मान्यता नव्हती.'[12] अस्पृश्यांना मंदिरात मूर्तीपूजा करू दिल्यास आपला हिंदूधर्म, मंदिरे आणि देवता अपवित्र होतील, संस्कृती लयास जाईल अशा विचारसरणीवर त्यांचा विश्वास होता. म्हणूनच या विचारसरणीत बदल होणे गरजेचे होते, नव्हे ती समाजाची गरज होती ही गरज 20 व्या शतकाच्या पूर्वार्धातील बुध्दीवंतांनी ओळखली. पं. श्रीधरशास्त्रीर पाठकांनी अस्पृश्यांच्या मंदिर प्रवेशास प्रत्यक्षात हिंदू धर्माची मान्यता असल्याचे स्पष्ट केले. यातूनच अस्पृश्यता निवारण चळवळीला मोठी चालना मिळाल्याचे दिसते.

### *नवस आणि बळी देण्याची प्रथा –*

खानदेशातील माणूस जेवढा श्रध्दाळू तेवढाच अंधश्रध्दाळू असल्याचे प्रकर्शाने जाणवते. मनातील इच्छापुर्तीसाठी देवाला नवस मानण्याची धार्मिक प्रथा रूढ होती. देवतेसमोर बोकड, कोंबडे कापून देवतेच्या मूर्तीवर रक्त शिंपडले जाई. नवस मानण्यासाठी विशिष्ट धर्माच्या देवतेचेच बंधन नव्हते. तर हिंदूधर्मीय पिराला नवस मानतांना आणि मुस्लीम लोक हिंदू मंदिरात नवस फेडतांना दिसतात. 'पश्चिम खानदेशातील चांदे (धुळे) या गांवी अनेक जाती–धर्माचे लोक पूर्वीपासून रहात असून पिरोबा हे या गावाचे दैवत आहे. सर्व लोक श्रध्देने त्याची पूजा करतात......... तो नवसाला पावतो अशी या गावातील नागरीकांची धारणा आहे. नवसामुळे जो मुलगा होईल त्याची शेंडी पिरोबाला वाहिली जाते.'[13] नवस फेडण्याचे खानदेशात अनेक प्रकार आहेत. त्यात मंदिरांचे विविध बांधकाम करून देणे, तीर्थयात्रा करणे, सत्यनारायण करणे, देवीची ओटी भरणे, देवतेला वस्त्रालंकार चढविणे अशा अनेक पध्दतीने नवस पूर्ण केला जातो.

नवस या प्रथेप्रमाणेच बळी देण्याचीही प्रथा खानदेशात पारंपारिक रितीने सुरू होती. मूळबाळ व्हावे म्हणून, गावातील संकट टळावे, साथीच्या आजारापासून गावाची सुटका व्हावी म्हणून बळी देण्याची प्रथा रूढ होती.

*गोवध प्रथा –*

खानदेशात 'गोवध प्रथा' ही हिंदू आणि मुस्लीम धर्मीयांत संघर्ष निर्माण होण्यास विशेष कारणीभूत झाल्याचे प्रत्ययास येते. गाईला हिंदूंनी पवित्र मानले तर इस्लाम धर्मीय गोमांस भक्षण करणारे यातूनच खानदेशात जातीय, धार्मिक वैमनस्य वाढीस लागल्याचे निदर्शनास येते. 20 व्या शतकात खानदेशात ठिकठिकाणी गोरक्षण संस्था स्थापन झाल्या. चाळीसगांव येथील गोरक्षण संस्थेतर्फे 'संयुक्त खानदेश गोसंवर्धन परिशद' 14 नोव्हेंबर 1937 रोजी राजमल लखीचंद यांच्या अध्यक्षतेखाली बोलाविण्यात आली.'[14] या परिषदेत गाईची हत्या बंद करण्याचा कायदा झाला पाहिज या गोष्टीवर विशेष भर देण्यात आला. 'गोहत्या म्हणजे हिंदूंच्या धर्मभावनांचाच खून आहे.'[15] असा विचार या परिषदेत मांडला गेला. पं. श्रीधरशास्त्रींच्या विचारसरणीचा अवलंब अशा परिषदेच्या माध्यमातून झालेला दिसतो. आपल्या वैदिक संस्कृतीचे संवर्धन आणि संगोपन झाले पाहिजे. परधिर्मीयांची आपल्या धर्मातील ढवळाढवळ थांबली पाहिजे या विचाराची सुरूवात या परिशदेद्वारे झालेली दिसते.

*धर्म अवडंबराचे थैमान*

खानदेशातील धर्मभोळया समाजाचा धार्मिक स्तोमे माजविण्याऱ्या धर्ममार्तंडांनी फायदा घेऊन धर्माच्या नावाखाली भोळया भाबडया समाजाची फसवणूक सुरू केलेली होती. खानदेशात मांत्रिक, तांत्रिक, भगत, भक्तीन आणि बुवाबाजीचे उदंड पीक आलेले होते. शरीराला भस्म फासून, टिळामाळांनी सजून, केसांच्या जटा वाढवून भोळया समाजाच्या चांगुलपणाचा फायदा भोंदूगिरी करणाऱ्या वर्गाने या काळात घेतला. खानदेशातील प्रकाशे येथील नावारूपाला आलेल्या धर्ममूर्ती सच्चिदानंद महाराज हा स्वतः मांसाहार आणि मद्यसेवन करीत असल्याचा उल्लेख आहे. 'सच्चिदानंद चाळीसगांवी एका तेलिणीच्या घाण्यावर बसून घाणा हाकीत होत.'[16] जनतेची फसवणूक करून ही व्यक्ती पूर्ण खानदेशातून पश्चिम खानदेशात आलेली होती. म्हणजेच स्वतः धर्मभ्रष्ट असून धर्मसंवर्धनाचे आव आणणारे धर्ममार्तंड समाजाची फसवणूक करीत असल्याचे निदर्शनास येते. 'स्वतःला राजयोगी म्हणवणारे हे बुवा लोक चैनीत आणि ऐशआरामात जीवन जगत........ धर्म म्हणून बाह्य आचरणाचे अवडंबर करून लोकसमुदायाची पिळवणूक करण्याचे प्रकार अज्ञानी जनतेत सतत करत.'[17] अशा काळात धर्माचे खरे स्वरूप मांडण्याची आणि ते समाजमनी उतरविण्याची गरज होती. खानदेशात पं. श्रीधरशास्त्रींनी आपल्या प्रगल्भ बुध्दीमत्तेने हे कार्य प्रभावीपणे केलेले आहे.

*खानदेशातील साधु–संत*

खानदेशाला श्रेष्ठ साधुसंतांची आणि त्यांच्या महान कार्याची सांस्कृतिक परंपरा लाभलेली आहे. 'चाळीसगांव नजीक वालझरी येथे वाल्मीकांचा आश्रम आहे. तर यावल येथे व्यासांची समाधी आहे. कण्वमुनींचा कानळदे या ठिकाणी आश्रम आहे. तर पुष्पदंतेश्वराचे मंदिर प्रकाशा या ठिकाणी आहे. एदलाबादला मुक्ताबाई आणि चांगदेव आहेत.'[18] प्राचीन ऋषीमुनींच्या सहवासाने खानदेशची आध्यात्मिक, सांस्कृतिक वृध्दी झाल्याचे निदर्शनास येते. संत ज्ञानेश्वर आणि मुक्ताबाई यांनी आपल्या अमृतवाणीने नैराश्यमय झालेल्या समाजात आत्मविश्वास निर्माण केला. संत जनार्दनस्वामी व रामाजनार्दन यांच्यासारखे संत या भूमीत निर्माण झालेत.'[19] या संतांनी आध्यात्मिकतेबरोबरच लोककल्याणाची पाळेमुळे खानदेशच्या भूमीत रूजविली. समाजव्यवस्थेत समानतेचा पुरस्कार केला, अध्यात्मिकतेला मानवतेची जोड दिली. 'चोपडा येथे नाथसंप्रदायाचा शीतलनाथ हा एक श्रेष्ठ साधुपुरूष होऊन गेला तर चाळीसगाव तालुक्यातील बोरखेडे येथे पिर शाहे दिलावर हा एक संत होऊन गेला.'[20] आजही खानदेशात हे गांव पिराचे बोरखेडे म्हणून ओळखले जाते. या भूमीत अनेक पंथ आणि संप्रदायाचे संत महंत होऊन गेलेत. अमळनेर येथील संत सखाराम महाराज, जळगांव येथील अप्पा महाराज हे या काळात विशेष प्रसिध्दीस आल्याचे दिसते. तर वैदिक वाङ्मयाचे सखोल अध्ययन करून वैदिक तत्वज्ञान सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्याचे महान कार्य खानदेशातील पारोळा येथील वेदांतवागीश श्रीधरशास्त्री पाठक यांनी केल्याचे निदर्शनास येते. 'संतांनी आपला धर्म, आपली परंपरा आणि आपल्या धर्मात सांगितलेले तत्वज्ञान यातील सत्व आत्मसात केले होते. आणि ते त्यांनी आपल्या जीवनात प्रत्यक्षात उतरविले असल्यामुळे ते पूर्णत्वास पोहोचले होत.'[21] पं. श्रीधरशास्त्रींनी धर्मसंस्कृतीचे साकल्याने अध्ययन केले होते. त्यातील तत्वज्ञानाचा, आचारांचा प्रत्यक्षात अंगीकार करून ते संतपदास पोहोचल्याचे प्रत्यंतर येते.

*धार्मिक वृत्तीचे सामाजिकरण करणारे सार्वजनिक उत्सव आणि यात्रा*

खानदेशच्या सांस्कृतिक जीवनात विविध धर्मपंथांच्या देव–देवतांची आराधना करण्याचा प्रघात आहे. लोकदेवतांची मोठया श्रध्देने उपासना केली जाते. खानदेशच्या प्राचीन संस्कृतीचा खुणा लोकदैवतांमध्ये प्रकर्षाने जाणवतात. 'जत्रा, उत्सवाच्या निमित्ताने गावातील विविध जातीधर्माचे लोक एकत्र येतात, हे एकत्र येणे सामूहीक आरोग्याच्या दृष्टीने फलदायी असते.'[22] सर्व धर्म एकसंघरित्या सार्वजनिक उत्सव अगर यात्रा साजरी करत असल्यामुळे

त्यांच्यात प्रेम, जिव्हाळा निर्माण होऊन निकोप वातावरण निर्माण होते; जे राष्ट्राच्या दृष्टीने हितकारक असतेत्र खानदेशात सांस्कृतिक ठेवा म्हणून अनेक उत्सव साजरे केले जातात. खानदेशचे एक महत्वपूर्ण वैशिष्टय म्हणजे कानबाईचा उत्सव जो खानदेशाव्यतिरिक्त कोणत्याही प्रांतात साजरा केला जात नाही. 'नंदुरबार तालुक्यात रूणमाळी आणि साक्री तालुक्यात कासारे येथे कानबाईची मंदिर आहेत. खानदेशात ब्राह्मण, वाणी, मराठा, सोनार, लोहार, न्हावी, महार, चांभार इ. जातीचे लोक श्रावण महिन्यात शुल्क पक्षात या देवतेची पूजा करतात.'[23] खानदेशातील सांस्कृतिक उत्सवांमध्ये ब्राह्मणांपासून ते थेट अस्पृश्य मानल्या गेलेल्या पददलित वर्गापर्यंत सर्व सहभागी होतांना दिसतात.

खानदेशात यात्रा हे एक धार्मिकतेचे अधिष्ठान मानले जाते. विविध देवतांच्या यात्रांचा उत्सव मोठया भक्तीभावने साजरे केले जातात. 'धुळे येथील एकवीरा देवी खानदेशाचे आराध्य दैवत आहे. एकवीरा देवीची यात्रा चैत्र पौर्णिमेला भरते.'[24] संपूर्ण खानदेशातून विविध जातीजमातीचे लोक या यात्रेत सहभागी होऊन देव–देवतांची मनोभावे आराधना करतात. खानदेशातील दुसरे धार्मिक ठिकाण म्हणजे मालेगांवपासून तीन किलोमीटर अंतरावर असलेले 'चंदनपुरीचे खंडोबा मंदिर होय. या ठिकाणी दरवर्षी पौष पौर्णीमेपासून पंधरा दिवस मोठी यात्रा भरते.'[25] खानदेशातील धनगर, मराठा, भोई, लोहार, कोळी, माळी, तेली, वाणी, ब्राह्मण इ. चे खंडोबा कुलदैवत आहे. त्यामुळे खानदेशात खंडोबाची मनोभावे आराधना केली जाते. नवस बोलले जातात आणि फेडलेही जातात. त्याचप्रमाणे 'अमळनेर येथे संत सखाराम महाराज यांनी 1816 मध्ये विठ्ठल मंदिर उभारले आहे. तेथे वैशाख शु. एकादशी पासून पौर्णिमेपर्यंत मोठी यात्रा भरते. अमळनेरला खानदेशातील प्रतिपंढरपूर म्हणतात.'[26] संपूर्ण खानदेशातून वारकरी संप्रदायाचे भक्तगण आणि भाविक या यात्रेत सहभागी होतात. अतिशय उत्साहाचे वातावरण त्या ठिकाणी असते. बहादरपूर येथे रामलाल मिश्र यांनी श्री बद्रीनारायणाची स्थापना केलेली आहे. दर वर्षी कार्तिक शु. एकादशीला रथातून आणि पौर्णिमेला पालखीतून ब्रदीनारायणाची संपूर्ण गावातून मिरवणूक निघते.'[27] हा उत्सव तीन दिवस चालतो. या काळात गावांत अतिशय चैतन्याचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण होते. परंतू खानदेशात अशा सार्वजनिक उत्सवात दोन धर्मांमध्ये काही क्षुल्लक कारणांवरून वितुष्ट निर्माण झाल्याचे प्रत्ययास येते. खानदेशच्या संत महंतांनी लावून दिलेला लळा, निकोप असे धार्मिक, सांस्कृतिक वातावरण निर्माण करण्यास महत्वपुर्ण ठरला.

हिंदू धर्माप्रमाणेच मुस्लीम धर्मीयांचे सार्वजनीक उत्सव खानदेशात साजरे केले जातात. पश्चिम खानदेशातील नंदुरबार येथे पिराचा मोठा उरूस भरतो. खानदेशातील श्रध्दाळू या उरूसास मोठया प्रमाणात सहभागी होतात. तसेच मोहरम, ताजिया, ईद हे मुस्लीम धर्मीयांचे उत्सवही मोठया उत्साहाच्या वातावरणात साजरे करतात. तर हिंदू धर्मीय दसरा, दिवाळी, होळी, नवरात्र उत्सव, गणेशोत्सव मोठया भक्तीभावाने आणि प्रसन्न वातावरणात साजरे करतात. खानदेशच्या धार्मिक जीवनात यात्रा आणि सार्वजनिक उत्सवांना अनन्यसाधारण महत्व आहे. त्यातून एक सामाजिकीकरणाची भावना दृढ झालेली दिसते. परंतु ब्रिटिशांच्या काळात या उत्सवांच्या काळातही जातीय सलोखा वाढण्याऐवजी ब्रिटिशांच्या कुटील राजकारणामुळे जातीय, धर्मीय तेढ निर्माण झालेली दिसते. त्यातूनच समाजजागृतीची गरज निर्माण झाली. पं. श्रीधशास्त्रींसारख्या विध्दानांनी आपल्या प्रगल्भ ज्ञानाच्या जोरावर अध्यात्मिक जागृतीला प्रारंभ केला. खानदेशी धर्मभोळा माणूस रूढीवादींच्या जाळयात सहज अडकला, ब्रिटिशांच्या कुटील डावास बळी पडला तर धर्मवेडया मुस्लीमांच्या आक्रमतेचा शिकार ठरला. या पार्श्वभूमीवर खानदेशी समाजव्यवस्थेला एक नवी दिशा देण्याची गरज भासू लागली आणि त्याच अनुशंगाने साने गुरूजी, आपश्री गुला महाराज, बाळूभाई मेहता, धनाजी नाना चौधरी आणि श्रीधरशास्त्री पाठकांनी सामाजिक संघटन निर्माण करणे, समाजाची सांस्कृतिक जडणघडण करणे, धर्म चिकित्सा करून समाजाला अध्यात्मिक दृष्टी बहाल करणे हे आपले जिवीतकार्य मानले.

### *संदर्भ साधने*

1) कालिन्दी (संकलन, संपादन), धर्मामृत (विनोबा), परंधाम प्रकाशन, पवनार (2000), पृ 11.
2) उपरोक्त, पृ. 13.
3) सहस्त्रबुध्दे पु.ग.,महाराष्ट्र संस्कृती (इ.स.पू. 235 ते इ.स. 1947) कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पूणे (2003), पृ. 151.
4) उपरोक्त, पृ. 152.
5) चौधरी. कि.का., महाराष्ट्र राज्य गॅझेटीयर : संस्कृती, पृ. 713.
6) जोशी (डॉ.) अविनाश (संपा.) आत्मबोध (दिवाळी विशेशांक 1993), प्रकाशक, सोहम सर्व्हिसेस, अहमदनगर, पृ. 13.
7) शहा (डॉ.) मु.ब., खानदेशचा सांस्कृतिक इतिहास, खंड 3, प्रकाशक, का.स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था, धुळे (2004), पृ. 7.
8) उपरोक्त, पृ. 3.
9) पगार सयाजी निंबाजी, खानदेशातील ग्रामदैवते आणि लोकगीते प्रकाशक, का.स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था, धुळे (1992), पृ. 14.
10) उपरोक्त, पृ. 74.
11) कलिन्दी (संकलन, संपादन), धर्मामृत (विनोबा), परंधाम प्रकाशन, पवनार (2000), पृ. 61.
12) पाटील (डॉ.) भी.ना. (प्राचार्य), खानदेशातील समाज प्रबोधनाची चळवळ, (1900–1950), प्रकाशक, पाटील भूषण

भीमराव (2005), पृ. 234.
13) उपरोक्त, पृ. 236, 237.
14) उपरोक्त, पृ. 243.
15) साप्ता. प्रबोधचंद्रिका, 22 नोव्हेंबर 1937, पृ. 3.
16) उपरोक्त, 18 मार्च 1935, पृ. 9.
17) पाटील (डॉ.) भी.ना. (प्राचार्य), खानदेशातील समाज प्रबोधनाची चळवळ, (1900—1950), प्रकाशक, पाटील भूषण भीमराव (2005), पृ. 248.
18) शहा (डॉ.) मु.ब., खानदेशचा सांस्कृतिक इतिहास खंड 3, प्रकाशक, का.स. वाणी मराठी प्रगम अध्ययन संस्था, धुळे (2004), पृ.1.
19) चौधरी कि.का. (संपा.) महाराष्ट्र राज्य गॅझेटीयर : संस्कृती, पृ. 713.
20) उपरोक्त, पृ. 714.
21) जोशी (डॉ.) अविनाश (संपा.), आत्मबोध (दिवाळी विशेशांक 1993), प्रकाशक, सोहम सर्व्हिसे, अहमदनगर, पृ. 34.
22) पगार सयाजी निंबाजी, खानदेशातील ग्रामदैवते आणि लोकगीते (प्रस्तावना), प्रकाशक, का.स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था, धुळे (1992), पृ. 14.
23) उपरोक्त, पृ. 15.
24) उपरोक्त, पृ. 40.
25) उपरोक्त, पृ. 42.
26) चौधरी कि.का. — महाराष्ट्र राज्य गॅझेटीयर : संस्कृती, पृ. 751.
27) मिश्र चंद्रशेखर, स्व. रामलाल काळुराम मिश्र जीवनी व स्मृतीसंच, पृ. 8.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net